## प्रकरण तिसरे

## भारत सेवक समाजाची स्थापना

## प्रकरण तिसरे

### भारत सेवक समाजाची स्थापना

शिक्षणाप्रमाणे राजकीय आणि सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रातही समर्पित वृत्तीने काम करणाऱ्या तरुणांची गरज आहे ही कल्पना गोखल्यांच्या मनात अनेक वर्षापूर्वीच येवून गेली होती. सार्वजनिक कार्यासाठी तरुणांना प्रशिक्षण देणारी एक नवी संस्था काढण्यासंबंधी गोखल्यांनी रघुनाथराव परांजप्यांना १८९७ सालीच लिहिले होते.[१] तरी १९०४-५ पर्यंत म्हणजेच फर्ग्युसन कॉलेजमधून निवृत्त होईपर्यंत आपल्या मनातील कल्पना प्रत्यक्ष उतरविण्याच्या दृष्टीने त्यांनी विशेष हालचाल केल्याचे दिसत नाही.

भारत सेवक समाज निर्माण करतांना गोखल्यांच्यापुढे युरोपातील जेसुईट लोकांचा आदर्श असावा असे वाटते. खरोखरच या जेसुईट लोकांचा इतिहास फार स्फूर्तीदायकआहे. सेंट झेवियरसारखे लोक आपला देश सोडून दुसऱ्या प्रदेशात केवळ ध्येयाने येतात. ज्यांची जात भिन्न, भाषा भिन्न, रितीरिवाज भिन्न, त्यास त्यांची भाषा शिकून उपदेश करतात. त्याना सुशिक्षित करण्यासाठी शाळा उघडतात. मिशनरी लोक परक्यांच्या प्रांतात जावून जर इतकी सेवा करीत असतील तर आपल्याच देशात ज्यांची मने आपण जाणतो, ज्यांचे आचार, विचार व स्वभाव आपणास पूर्ण माहित आहे, त्यांच्यासाठी आपण कार्य कां करु नये ? असा विचार त्यांच्या मनात आला असावा.

जेसुईट लोकांच्यापेक्षा कदाचित जास्त रामदासी पंथही गोखल्यांच्या डोळ्यासमोर असावा. रामदासांचे सतराव्या शतकांतील कार्य पाहिले की, मन चकीत होते. दळणवळणाची नीट साधने नसतांना व मुसलमानांचे वर्चस्व सर्वत्र प्रस्थापित झालेले असताना त्यानी अकराशे मठ स्थापन केले.[२] देशाचा असा एकही भाग नव्हता की, जेथे मठ नाही. ज्या शहरांची भरभराट झाली असेल

तेथे समर्थांचे दोन मठ असायचेच. समर्थांनी या मठांचे एकीकरण केले. प्रत्येक मठात ग्रंथालय उभे केले. समर्थ एकटे भिक्षेच्या बळावर कोणापाशी विशेष याचना न करता जे करू शकले ते सध्याच्या सुशिक्षितांच्या काळात, दळणवळणाची साधने अनकुल असताना आपण कां करू नये ? असा विचार गोखल्यांच्या मनात आला असावा.[३]

बारा वर्षांची बुध्दिमान आणि पाणीदार मुले आपल्याजवळ ठेवायची. त्यांच्या पालकांपासून आम्ही मुलांना परत नेणार नाही असा करार करून घ्यावयाचा. नंतर या सर्व मुलांना सर्व प्रकारचे राजकीय शिक्षण द्यावयाचे. इंग्रजी शिकवावयाचे आणि आठ-दहा वर्षे अध्ययन झाल्यानंतर निरनिराळ्या ठिकाणी कार्ये करण्यासाठी राजकीय संदेशवाहक म्हणून पाठवून द्यावयाचे, असा त्यांचा प्रथम मानस होता.

या मुलांचा खर्च भागविण्याकरीता गोपाळरावांनी एक योजना आखली होती. त्यांनी दत्तोपंत वेलणकर यांना भांडवल देवून मोठ्या प्रमाणावर उद्योगधंदा करा असे सांगितले आणि या धंद्याच्या फायद्यातून या मुलांचा खर्च चालवावयाचे ठरले. पुढे गोपाळराव कौन्सिलमध्ये गेले. मोठ्या लोकांत वावरू लागले. त्यामुळे हळूहळू त्यांचे विचार बदलू लागले. लहान मुले घेण्याऐवजी पदवीधर झालेले तरूण आपल्या पंथात घ्यावे, त्यांना दोन-तीन वर्षे राजकीय शिक्षण द्यावे व त्यांच्या निर्वाहाची तरतूद करून त्याना देशसेवा हेच एक महत्त्वाचे कर्तव्य आहे असे दाखवून द्यावे असे वाटले.[४]

उद्देशपत्रिका :

"हिंदुस्थानातील सार्वजनिक जीवन विस्कळीत व बेशिस्त आहे" आणि बहुसंख्य तरूणांच्या ठिकाणी "संयम व भारदस्तपणा यांचा अभाव आहे. याचे भान गोखल्याना होते.[५] सोसायटीच्या घटनेच्या मूळ मसुद्यातील पाचव्या कलमान्वये नव्याने प्रविष्ठ झालेल्या प्रत्येक सभासदाला पाच वर्षांपर्यंत [illegible]

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

क्रमांकाच्या सभासदांच्या "संपूर्ण आज्ञेत" राहण्याची शपथ घ्यावी लागणार होती. "संपूर्ण आज्ञेत" राहण्याची कल्पना त्यांच्या कांही मित्रांना मान्य नव्हती. जेसुईट संघटनेत कांही सभासदावर ३१ वर्षेपर्यंत आज्ञेत राहण्याची अट घातलेली असते याची आठवण गोखल्यानी या मित्रांना करुन दिली. पाचव्या कलमाने व्यक्ति-स्वातंत्र्याला बाधा येते ही टीका गोखल्यांना फारशी पटली नाही. तरीदेखिल त्यांनी हे कलम थोडे सौम्य केले. सुधारीत स्वरुपात हे कलम असे होते. प्रशिक्षणाच्या काळात प्रत्येक सभासद प्रथम क्रमांकाच्या श्रेष्ठ सभासदाचे मार्गदर्शन व नियंत्रण पूर्णतया स्वीकारील आणि त्याच्या आदेशानुसार अभ्यास हाती घेईल. कृष्ण स्वामी अय्यर यांना गोखल्यांनी लिहिले, "पुरेशा संख्येने तरुण माणसे पुढे येतील अशी मला आशा आहे. या तरुणांना मी व्यक्तीशः किती प्रभावित करतो, त्यांना आकार देवू शकतो यावर बाकी सारे अवलंबून आहे. त्याबद्दल आज कांहीच सांगता यावयाचे नाही. पाच वर्षांनंतर कदाचित कांही स्पष्टता येईल.[६]

सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीच्या घटनेच्या प्रास्ताविकांत संस्थेची भूमिका उद्दिष्टये इ. स्पष्ट केलेली होती. त्याचे लेखन गोखल्यानीच केले होते. हे प्रास्ताविक म्हणजे गोखल्यांच्या राजकीय निष्ठेचा आलेख होता. समान परंपरा, समान त्रुटी व दुबळेपणा, समान आशा-आकांक्षा यांच्या आधारे गेल्या पन्नास वर्षांमध्ये हिंदुस्थानात समान राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा "आश्चर्यकारक परिपोष" झाला असल्याचे त्यांनी आरंभीच नमूद केले. आपण प्रथम हिंदी आहोत आणि मगच हिंदू वा मुसलमान वा पारशी वा ख्रिश्चन आहोत. याचे वाटते भान आढळत होते. आपल्या उज्वल आणि थोर भूतकाळास साजेसे असे स्थान पृथ्वीवरील राष्ट्रांच्या मेळाव्यात पुन्हा एकवार प्राप्त करुन घेण्यासाठी दृढनिश्चयाने वाटचाल करीत असलेला एकात्म व पुनरुज्जीवीत हिंदुस्थान हे आज कांही प्रतिभावंत मंडळीचे केवळ स्वप्न उरलेले नाही. या देशाचे नेतृत्व करणाऱ्या समंजस, बुद्धिवादी व सुशिक्षित वर्गाने निश्चयपूर्वक स्विकारलेले ते ब्रीद आहे.[७]

लोकामध्ये एक नवीन चैतन्य सळसळते आहे. देशाच्या पुनरुत्थानाचा पाया घातला गेला आहे. पण वरची इमारत उठविण्याचे मोठे काम अद्यापि करावयाचे बाकी आहे.

समाजात व्यक्तिगत हेवेदावे व भांडणांना मोकळीक नव्हती. ऐहिक स्वार्थ संपादन आणि व्यक्तिगत महत्त्वाकांक्षा यापासून अलिप्त राहून सभासदाने सार्वजनिक कार्यास सर्वस्वी वाहून घ्यावे अशी अपेक्षा होती. देश सेवेमध्ये पूर्ण समर्पित वृत्तीने आपले सारे आयुष्य वेचण्याची तयारी असलेल्या तरुणांना राजकीय शिक्षण आणि संघटन यांचे प्रशिक्षण देण्यासाठी तसेच हिंदुस्थानच्या जनतेच्या राष्ट्रीय हिताचे सनदशीर व घटनात्मक मार्गांनी संवर्धन करण्यासाठी सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीची स्थापना केली जात आहे असे गोखल्यांनी लिहिले होते. "वैराग्यशाली राजकीय यात्रिक" असे "भारत सेवकाचे" वर्णन ब्रिटिश पत्रपंडित हेन्री नेव्हिनसन यांनी एकदा केले होते. हिंदी राष्ट्रवादाचे मिशनरी प्रचारक बनू इच्छिणाऱ्या या तरुणापुढे गोखल्यांनी एक उदात्त ध्येय ठेवले होते.

गोखल्यानी लिहिले, "देशप्रेमाचे भरते इतके आले पाहिजे की, त्यापुढे बाकी साऱ्या गोष्टी दुय्यम ठराव्यात. मातृभूमीसाठी त्याग करण्याच्या प्रत्येक संधीने ह्रदय उचंबळून येईल अशी उत्कट देशभक्ती, संकट वा अडथळा यांनी मुळीसुद्धा न डगमगणारी दृढनिश्चयी वृत्ती, नियतीच्या कार्याविषयी अज्ञानेही विचलीत न होणारी गाढ श्रद्धा या गुणवैशिष्ट्यांनी संपन्न होवून त्याने (सोसायटीच्या सभासदाने) आपल्या जीवितकार्यास प्रारंभ करावयाचा आहे. आणि मायदेशाच्या सेवेत आयुष्य वेचण्यातून मिळणाऱ्या आनंदाची पूज्यभावाने साधना करावयाची आहे. [८]

सोसायटीची स्थापना १२ जून १९०५ रोजी व्हावयाची होती. स्थापनेचा दिवस जसा जवळ आला तसा गोखल्यांच्या मनात एकीकडे,

सोसायटीच्या कार्यात अपरिहार्यपणे उपस्थित होणाऱ्या समस्या आणि दुसरीकडे, त्यातून सिध्द होणाऱ्या शक्यता या दोहोंचा विचार दाटून आला, आणि चिंता, आशा आणि उल्हास यांनी ते हेलावून गेले. हाती घेतलेल्या कार्यात यश येईल की, अपयश पदरात घ्यावे लागेल हे या क्षणाला सांगता येणार नव्हते. पण आपल्या आयुष्यातील हा निर्णय सर्वात महत्त्वाचा आहे, याचे गोखल्यांना पूर्ण भान होते.

३ जून १९०५ रोजी सरला राय याना गोखल्यांनी लिहिले, "आजवर तीन व्यक्तींनी सोसायटीला येवून मिळण्याची तयारी दाखविली आहे. आजपासून आठ ते दहा दिवसांनी ते तिघे आणि मी स्वत: पूर्वनिर्धारित प्रतिज्ञा घेवू आणि सोसायटीची स्थापना करु. या पुढच्या काळात हे माझे एकमेव जीवितकार्य असेल आणि या कार्यसिध्दित माझ्या जीवनाची सार्थकता असेल. समुद्रात नाव लोटून देण्याच्या तयारीने मी उभा आहे. सागराच्या अथांग विस्ताराने मी पुरता हेलावून गेलो आहे. वेगवेगळ्या भावना अंत:करणात दाटून आल्या आहेत. यापुढे सर्वस्वी खाजगी असे आयुष्य मला उरणार नाही. याविषयी किंचित खंतही मनाला अजून वाटते आहे. माझ्या जीवनाचा हेतू सफल करण्यात मी यशस्वी झालो आहे. या विचारातून येणारी कृतार्थतेची भावनाही मनात आहे. कारण माझे सारे आयुष्य या परिपूर्तीच्या दिशेनेच वाटचाल करीत होते. असे खोलवर मला वाटते आहे. आणखी दहा वर्षे मला आयुष्य लाभले तर, मी स्थापन करीत असलेली ही सोसायटी दहा वर्षांच्या अखेरीस देशोध्दाराच्या दिशेने कार्य करणारी एक मोठी शक्ती बनलेली असेल असा मला आत्मविश्वास आहे. आणि समजा, त्या आधीच मी या जगाचा निरोप घेतला तरी, ज्या मर्यादा स्विकारून कोणतेही कार्य करावे लागते त्या मर्यादेत म्हणजेच आपल्या परीने प्रयत्नांची व समर्पणाची पराकाष्ठा करणाऱ्या मर्यादेत - माझ्या देशासाठी माझे सर्वस्व मी पणाला लावले, हे समाधान मला येईल." [९]

आपल्या विचारांना मूर्त स्वरूप देण्यासाठी गोपाळराव गोखले यांनी १२ जून १९०५ रोजी पुणे येथे भारत सेवक समाजाची स्थापना केली.[१०] समाजाच्या पायाचा पहिला दगड न्या. रानडे यांचे स्नेही आबासाहेब साठे यांच्या हस्ते बसविला. फर्ग्युसन कॉलेज जवळील टेकडीवर उगवत्या सुर्याला साक्षी ठेवून प्रथम स्वत: गोपाळराव गोखल्यांनी भारत सेवा वृत्ताची शपथ घेतली आणि मग तीच भारतसेवावृताची शपथ त्यांनी आपल्या मागोमाग श्री. नटेश अप्पाजी द्रविड, गोपाळ कृष्ण देवधर व वामनराव पटवर्धन यांस दिली. आपले सर्व आयुष्य भारतभूमीच्या सेवेस अर्पण करण्याची ती शपथ होती.[११] आज या संस्थेत हिंदुस्थानच्या राजकीय, संपत्तिक, सामाजिक स्थितीसंबंधीच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी एक मोठे ग्रंथालय आहे. भारत सेवेची ती खरी शाळा आहे. गोपाळराव गोखले दर पावसाळ्यात नवीन होतकरू सेवकांना तेथे जमवून इष्ट कार्याचे वळण लावून देत असत. कॉंग्रेसची स्थापना होण्यापूर्वी बंगाली तरुणांना उद्देशून ह्यूमसाहेबांनी काढलेल्या पत्रकांप्रमाणेच भारत सेवक समाजाचे ध्येय बहुतांशाने होते असे फिरोजशहा मेहतांचे चरित्रकार सर होमी मोदी सांगतात. ब्रिटिश साम्राज्यान्तर्गत वसाहतीचा दर्जा हिंदुस्थानास शक्य तेवढ्या लवकर प्राप्त करून देणे त्यासाठी अविश्रांत श्रम व देशाची संघटना करणे, संकटे व मोह टाळून आपले कर्तव्य करीत राहणे, या सर्व गोष्टींची जाणीव जनतेस देण्याकरिता ऐहिक सर्वसंग परित्याग करून देशप्रेमाने जीवन व्यतीत करणाऱ्या "राजकारणी संन्याशांची" संस्था म्हणजे भारत सेवक समाज होय."[१२]

## सभासदांना मिळणारे मानधन :

गोखल्यांनी जे नियम केले होते. त्यानुसार सभासदांनी अल्प मानधनावर निर्वाह करावयाचा होता. पैसे मिळविण्याचा अन्य कोणताही खाजगी व्यवसाय करण्यास त्यांना पूर्ण प्रतिबंध होता.[१३] सभासदांना पुढीलप्रमाणे मानधन मिळत असे.

१) उमेदवारीच्या काळात प्रत्येक सभासदाला पहिल्या दोन वर्षांसाठी महिना ३०/- रु. भत्ता मिळत असे. आणि पुढील तीन वर्षांसाठी महिना ३५/- रु. मिळत असत.

२) प्रत्येक सामान्य सभासदाला पहिल्या पाच वर्षांसाठी महिना ५५/- रु. आणि महिना ६०/- रु. नंतरच्या पाच वर्षात मिळत असत.

३) सर्व सभासदांना महिना १०/- रु. व्यक्तिगत भत्ता मिळत असे.[१४]

४) शाखेच्या प्रमुख सभासदाला महिना १०/- रु. विशेष भत्ता मिळत असे.

५) नवीन कायम सहाय्यकांना महिना १५ ते २० रु. भत्ता मिळत असे तर जुन्या कायम सहाय्यकांना महिना २० ते ३० रु. भत्ता मिळत असे.[१५]

<u>सभासदांची कर्तव्ये व त्यांनी घ्यावयाची शपथ :</u>

सनदशीर मार्गाने चळवळ करून देशाची सर्वांगीण उन्नती करणे व ती उन्नती करण्यासाठी देशातील तरुणांना तयार करणे हे संस्थेचे ध्येय होते. त्यासाठी सभासदांना खालील गोष्टी कराव्या लागत असत.

१) आपल्या स्वत:च्या उदाहरणाने जनतेत खरीखुरी देशभक्ती उत्पन्न करणे, आणि त्यासाठी स्वार्थत्याग करावयास शिकविणे.

२) लोकांना राजकीय शिक्षण देणे आणि समाजात चळवळ करून लोकमत तयार करणे.

३) निरनिराळ्या जातीमधील विरोध नष्ट करून सलोखा व प्रेमभावना उत्पन्न करणे.

४) मागासलेल्या जातीत शिक्षणाचा फैलाव करणे, औद्योगिक धंदेशिक्षणासंबंधी जास्त सुसंघटित प्रयत्न करणे.

५) अस्पृश्यांची सर्वतोपरी सुधारणा करणे.

संस्थेची मुख्य कचेरी पुणे येथे असावयाची. तथे राहावयास वसतिगृह व अभ्यासासाठी पुस्तकालय असेल.

१) सोसायटीचा एक "फर्स्ट मेंबर" म्हणजे मुख्य अधिकारी असेल व तो जन्म-पावेतो असेल.

२) सामान्य सभासद.

३) विद्यार्थी.

समाजाचे हे तीन घटक होत. प्रत्येक विद्यार्थ्यास पाच वर्षे शिक्षण देण्यात येईल.[१६]

संस्थेचे सर्व नियम फर्स्ट मेंबर आणि तीन साधारण सभासद यांच्या अनुमतीने आणि सल्ल्याने होतील. बहुतेक सर्व सत्ता फर्स्ट मेंबरच्या हातात राहील. तीन मेंबरांचे एक कौन्सिल असेल. या कौन्सिलने शिफारस केल्याशिवाय कोणालाही सभासद करून घेता येणार नाही.[१७] प्रत्येक सभासदाला खालीलप्रमाणे शपथ घ्यावी लागत असे.

१) माझ्या डोळ्यापुढे सदैव देशाच्या कल्याणाची गोष्ट प्रथम राहील. माझ्यात जे जे कांही उत्कृष्ट आहे ते ते सर्व मी आपल्या देशाच्या सेवेसाठीच समर्पण करीन.

२) देशाची सेवा करताना स्वार्थाचा कोणताही विचार मी मनात येऊ देणार नाही.[१८]

३) सर्व भारतीय लोकांना मी माझे भाऊ असे समजेन. त्यांच्या उन्नतीसाठी जात, धर्म, पंथ यांचा विचार न करता मी प्रयत्न करीन.

४) माझ्या किंवा माझ्या कुटुंबासाठी समाज (भारत सेवक समाज) जे कांही

द्रव्य देईल त्यातच मी आनंद मानीन व समाधानाने राहीन. स्वत:साठी याहून अधिक पैसा मिळविण्याचा प्रयत्न मी करणार नाही.

५) मी आपले खाजगी वर्तन अत्यंत पवित्र ठेवीन.

६) कोणाशीही कोणत्याही कारणावरून भांडणार नाही.

७) भारत सेवक समाजाचे ध्येय सदैव मी डोळ्यासमोर ठेवीन. शक्य तितक्या कळकळीने व तळमळीने मी समाजाच्या अभिवृद्धीसाठी प्रयत्न करीन.

या सात शपथा म्हणजे एक प्रकारची सप्तपदीच होती. ही सप्तपदी घेतली म्हणजे तो मनुष्य भारत सेवक समाजाचा सदस्य झाला असे समजले जात असे. गोखल्यांनी या शपथा केवळ दुसऱ्याकडून वदवून घेतल्या असे नव्हे, तर ते स्वत: अगोदर त्याप्रमाणे वागले होते व शेवटपर्यंत वागत राहिले.[१९]

अशा शपथबद्ध सभासदांच्या संघटनेची व तिच्याकडून निरलसपणे होणाऱ्या विधायक, शिस्तबद्ध आणि शास्त्रशुद्ध सेवाकार्याची गोपाळराव गोखल्यांना अनेक वर्षे आवश्यकता जाणवत होती. कारण हिंदुस्थानच्या सार्वजनिक उभारणीत १८९३ पासून ज्या नव-नवीन कृतिप्रणाली पुढे येत होत्या त्यांचे ध्येय हिंदुस्थानची प्रतिष्ठापूर्वक उन्नती हे एकच असले तरी, तिच्या साध्यासाठी देशात चार राजकीय प्रणाल्या निर्माण झाल्या होत्या. त्या पुढीलप्रमाणे -

१) प्रस्तुतच्या हीन स्थितीचे परकीय सत्ता हेच सर्वस्वी कारण असून स्वातंत्र्याखेरीज आपले दारिद्र्य नाहीसे होण्यास दुसरे कोणतेही साधन नाही. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी प्रसंगी राजकीय खून, बॉम्ब यांचाही वापर करावयास हरकत नाही असे यांचे म्हणणे होते. या विचारप्रणालीच्या लोकांना सत्ता विध्वंसक अराजक, अत्याचारी अशी नावे मिळाली होती.[२०]

२) दुसरा वर्ग क्रांतीकारकांचा होता. पहिल्या वर्गासारखे ब्रिटिश रियासतीचे उघड शत्रुत्व या वर्गाला मान्य नव्हते. आपल्या भाषणाने आणि

लेखणीने तरुण, उत्साही आणि भावनाप्रधान पिढीवर स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करण्याची गरज आणि महत्व यांचा ठसा हा वर्ग उमटवित होता. हिंदुस्थानात प्रचलीत असणारे सरकार आणि त्याशी संलग्न असणाऱ्या संस्था व व्यक्ती यांच्यावरील बहिष्कारापासून सर्व जालीम अशा उपायांचा पुरस्कार हा वर्ग करीत असे.

३) तिसरा वर्ग असंतोषवाद्यांचा होता. स्वराज्य म्हणजे निर्भेळ स्वातंत्र्य प्राप्त झाल्याखेरीज देशाचे पाऊल कोणत्याही तऱ्हेने पुढे पडणारच नाही असे यांचे मत होते. पहिल्या दोन वर्गापेक्षा हा वर्ग अधिक व्यवहारवादी होता. परकीय सत्तेशी जीवन व्यवहारासाठी प्रजेला अपरिहार्य तेवढा सर्व सहकार करावा लागतो. तेव्हा तेवढाच काय तो करावा. बाकी सर्व ठिकाणी, ज्याला जितका जमेल त्याने तितका परकीय सत्तेला विरोध प्रगट करावा. अशी या वर्गाची विचारसरणी होती. पहिल्या दोन वर्गाप्रमाणेच पण स्वत:च्या मर्यादा सांभाळून परकीय सत्तेच्या तिरस्काराने, धिक्काराने आणि निदान नाखुषीच्या संदर्भाने सर्व व्यवहार चालविले पाहिजेत असा या वर्गाचाकटाक्ष असे. परकीय सत्तेमुळे लोकांचा पदोपदी तेजोभंग होतो. तेव्हा राजकीय उन्नतीशिवाय औद्योगिक, सामाजिक व नैतिक उन्नती होणे शक्य नाही असा यांचा ठाम विश्वास होता.[२१]

४) या तीन वर्गाशिवाय आणखी एक जो वर्ग होता तो देशाची हीनदीन स्थिती गेलीच पाहिजे असे मानणारा होता. त्यासाठी परकीय सत्ता जाणे आवश्यक आहे. पण ती जाण्यासाठी करावयाच्या प्रयत्नात स्वकीय सत्ता सबल, शहाणी व शीलसंपन्न असली तरच ती टिकाव धरील. म्हणून ज्या कारणाने पारतंत्र्य आले त्याचे निर्मूलन होईल असे जनतेला शिक्षण द्यावे. परकीय सत्तेच्या चुका तिच्याच गळ्यात बांधून तिला लोकानुकूल करीत जावे व प्रगतीची धीमी पावले दिवसे-दिवस ठाम करीत असावे.

या चौथ्या वर्गाचे राजकारण प्रभावीपणे करण्यासाठी गोपाळराव गोखल्यांनी भारत सेवक समाजाची स्थापना केली.[२२]

भारत सेवक समाजाचे ग्रंथालय :

हिंद सेवकांच्या अभ्यासाकरिता ग्रंथसंग्राहाखेरीज गत्यंतर नाही हे ध्यानात घेऊन गोपाळरावांनी जो संग्रह समाजाच्या इमारतीत साठविला तो अनेक प्रकारे अपूर्व म्हणता येण्याजोगा निदान त्याकाळी तरी होता. ईस्ट इंडिया कंपनीच्या कारभाराला या देशात प्रारंभ झाल्यापासून जे जे कांही कंपनीमार्फत किंवा स्वतंत्रपणे प्रसिध्द झाले त्याची जास्तीत जास्त संख्या तेव्हा ग्रंथसंग्रहालयाच्या एका विभागात होती, व ती चांगल्या स्थितीत होती.[२३] ब्रिटिश राज्यव्यवस्थेबद्दल अनेक विचारवंतानी पुस्तके प्रसिध्द केली होती. त्या पुस्तकांचे महत्व गोपाळरावांना पटले होते. म्हणून त्यानी ती सर्व पुस्तके जमा केली होती. हिंद सेवकांने पहिली पांच वर्षे अभ्यासात खर्च करावी असा समाजाचा नियम होता. समाजाचा हा नियम मोठ्या ग्रंथसंग्रहाखेरीज सार्थ ठरला नसता.[२४]

आर्थिक मदत :

भारत सेवक समाजाच्या कार्यास गोपाळराव गोखल्यांच्या स्नेहल चाहत्यानी सढळ हाताने मदत केली. म्हणूनच सुमारे तीन लाख रु. खर्चून समाजासाठी इमारती, सभासदांना राहण्याची जागा, ग्रंथसंग्रहालय, छापखाना, वृतपत्रे इ.साधने अस्तित्वात आली.[२५] गोखल्याना मुंबईच्या धनिक लोकांचाही चांगलाच पाठिंबा मिळाला. पारशी समाजातही त्यांचे वजन होते. गोखल्यांनी पैसे मागीतले तर त्यास नकार येत नसे. अशा प्रकारचा नि:संग भिकारी आपल्या दारी येणे म्हणजे भाग्य समजले जायचे. गोखले पुष्कळदा स्वत:ला वाटेल तो आकडा घालून श्रीमंत शेटजीकडे पाठवित असत व त्वरीत शेठजीकडून पैसे येत असत. तुम्ही पैशाचे काय करता असे कोणी विचारीत नसे. जोपर्यंत वरिष्ठ कायदे कौन्सिल कलकत्त्यांस

होते, तोपर्यंत दरवर्षी कौन्सिलच्या बैठकीहून परत येतांना गोपाळराव धनसंपन्न बंगाली जमीनदाराकडून व लक्षाधिशाकडून दहा-वीस हजार रुपये घेवून येत असत. गोपाळराव जोपर्यंत ह्यात होते, तोपर्यंत पुष्कळ बंगाली लोक दरवर्षी नियमाने पैसे पाठवित असत. गोखल्यांच्या या भारत सेवक समाजासाठी इंग्लंडमधील एका गरीब बाईने एक गिनी पाठवून दिली होती. राजवाडे यांच्या ग्रंथप्रकाशनासाठी चिपळूणाच्या एका गरीब माणसाने असेच एकदा चार आणे दिले होते. गोपाळरावांना त्यागिनीचे फार कौतुक वाटले व ते म्हणाले, "यानाच कामाची माहिती खरी समजली आहे."[२६]

## सरकारी उपेक्षा आणि संशय :

आपल्या संस्थेबद्दल सरकारात संशय नसावा यासाठी गोपाळरावांनी आपले उद्देशपत्रक तेव्हाचे गव्हर्नर लॉर्ड लॅमिंग्टन व त्याचे सल्लागार यांच्याही नजरेखाली घातले होते. कोणीही कसलाच आक्षेप उपस्थित केला नाही. परंतु संशय कायम राहिल्याने सरकारी गुप्त हेरांनी सभासदांच्या हालचाली न्याहाळण्याचे काम सोडले नाही. गोपाळरावांचे मद्रासमधील परमस्नेही कृष्णस्वामी अय्यर यांनी सरकारी अंमलदारांना विश्वासात घेण्याला हरकत नाही असे लिहून संमती दिली होती. त्याप्रमाणे ते उद्देशपत्रक गव्हर्नरकडे गेले. त्याने मुळीच आक्षेप घेतला नाही. नंतर मुंबईच्या गव्हर्नरने हिंदसेवक समाजाची बातमी कर्झनसाहेबांना कळविली. तेव्हा त्याने मासलेवाईक उत्तर पाठविले, "गोखले व त्यांची संस्था यांना हिशेबात घेवू नये." अशा आशयाचे ते उत्तर होते. मासलेवाईक म्हणण्याचे कारण हे की, १९०४ मध्ये "सी.आय.ई. हा किताब गोपाळरावांना बहाल करतांना स्वदस्तूरच्या पत्रात ज्याने गोपाळरावांच्या गुणांचा यथेच्छ गौरव लिहिला होता, त्यानेच वरच्याप्रमाणे अनुदारपणा दाखविला.[२७] लॅमिंग्टननंतर मुंबईला गव्हर्नर होवून आलेले सर जॉर्ज सिडनहॅम क्लार्क यांनी एकदा हिंद सेवक समाजाला भेट दिली होती. पण हा प्रकार पूर्णपणे विसरून त्यांनी श्री निवासशास्त्री यांच्याशी हिंदसेवक समाज राजकीय कामास केव्हा लागले असा

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

प्रश्न विचारून वाद घातला. शास्त्रीबुवानी पूर्वी झालेल्या राजकारणपर संवादाची व राजकीय पुस्तके नजर केल्याची आठवण करून दिली तेव्हा त्यांच्या मनातील गोंधळ नाहिसा झाला.[२८]

१९ ऑगस्ट १९१० रोजी तेव्हाचे पब्लिसिटी सर गायफ्लीटवुड विल्सन यांनी बरेच तास हिंदसेवक समाजात काढले. त्यावेळी गोपाळरावांच्यासह एकवीसजण समाजात होते. तेव्हा त्यानी दिलेला अभिप्राय पुढीलप्रमाणे, "गोपाळरावांखेरीज बाकीचे सारे विशीतिशीच्या वयातले व सारे मोकळ्या मनाचे दिसले. व्यक्तिशः आणि समुदायशः सर्वांशी निःसंकोच संवाद केला. गोखल्यांशी पुष्कळ बोललो. पण कुणाच्याही बोलण्यातून मला समाजाचे निश्चित ध्येय आकलन करता आले नाही. सारी कल्पना स्वप्नाळू वाटते. गोखल्यांना उत्तम नागरीक तयार करावयाचे आहेत. सारे सभासद उत्कृष्ट शिक्षण घेतलेले असून ते हळूहळू निर्वाहाकरीता सरकारी किंवा म्युनिसिपल नोकरीत शिरतील, असे मला भय आहे. परंतु नोकरी मिळाल्यास ते उत्तम कामगिरी बजावण्याच्या लायकीचे आहेत यात संशय नाही." असे त्यांनी म्हंटले आहे.[२९]

१९१० साली विल्सनसाहेबांनी वरील अभिप्राय "कुणासही न पाठविलेली पत्रे" यातल्या एका पत्रात लिहून ठेवला आहे. त्या पत्रांचे पुस्तक पुढे दहा वर्षांनी प्रसिध्द झाले. गोखल्यांच्या ह्यातीत व पश्चात श्रीनिवासशास्त्री, देवधर, द्रवीड, ठक्करबाप्पा, ना.म. जोशी प्रभृतीनीकेलेल्या कामाकडे लक्ष दिले असते तर विल्सनसाहेबांना आपला प्रस्तुत अभिप्राय बदलणे भाग पडले असते. विल्सनसाहेबांच्या म्हणण्याप्रमाणे कोणताही सभासद सरकारी अथवा म्युनिसिपल नोकरीत गेला नाही. कांहीजण समाज सोडून गेले. पण ते उमेदवारीच्या काळात गेले. त्यावेळी ते संस्थेचे कायम सभासद नव्हते.[30]

## टिळक पक्षाचा विरोध :

या संस्थेविषयी टिळकांच्या पक्षाची प्रारंभी पुष्कळ वर्षे वक्रदृष्टी होती.

शहराबाहेर दूर अंतरावर या संस्थेचे केंद्र असल्यामुळे हिंद सेवकांना "माळावरील महारोगी" या शब्दांनी ओळखण्याचा महाराष्ट्राच्या कट्टर टिळकानुयायांत पुष्कळ वर्षे प्रघात होता.[31] सर्व्हंटच्या "सुरूंग" या अपभ्रंश रूपाने हिंदसेवकांचा निर्देश करण्याची हौस पुण्यास खाजगी बोलण्यात व कित्येक वृत्तपत्रातूनही भागवली जात असे. परंतु त्याचा परिणाम आपल्या कामगिरीवर पहिल्या विख्यात हिंद-सेवकांनी होऊ दिला नाही. गोपाळरावांच्या पश्चात म. गांधींनी संस्था व संस्थेचे सदस्य यांच्या संबंधाचे ममत्व कधी सोडले नाही. श्रीनिवासशास्त्री गोपाळरावांमागून कर्तबगारीने इतके मोठे झाले की, सरकार, जनता आणि टिळकांसह टिळकपक्ष यापैकी कुणालाच त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे शक्य झाले नाही.[32]

## सोसायटीचा प्रभाव :

हिंदुस्थानच्या सार्वजनिक जीवनावर सोसायटीच्या कांही सभासदांनी पुढील काळात आपला ठसा उमटविला. श्रीनिवासशास्त्री कायदेकौन्सिलर, दूत आणि प्रिव्ही कौन्सिलर म्हणून चमकले. कुंजरू उत्तम संसदपटू म्हणून गाजले. अमृतलाल ठक्कर मोठे समाजसुधारक म्हणून नावाजले गेले. ना.म. जोशी कामगार क्षेत्रात पुढे आले.[33] "ज्ञान प्रकाश चे" संपादक म्हणून द्रवीडांनी काम केले. अ.वि. पटवर्धनांनी आर्यभूषण छापखाना सांभाळला. पहिल्या महायुद्धाच्यापूर्वी सोसा-यटीचे आजीव सदस्य बनणाऱ्या तरूणास आपण सन्याशाच्या मठात प्रवेश करीत आहोत, आपणास सन्मान किर्ती किंवा प्रतिष्ठा मिळणार नाही, असे वाटत असले पाहिजे. वैयक्तिक महत्त्वाकांक्षेचा पूर्ण त्याग आणि गरीबीचा स्वेच्छापूर्वक स्वीकार, या दोन्ही गोष्टींनी नातेवाईक व मित्र यांना धक्का बसत असला पाहिजे. जे घडत होते ते त्यांना विश्वास ठेवण्यासारखे वाटत नव्हते. अमृतलाल ठक्कर यांनी नोकरी सोडून सोसायटीचे आजीव सभासद व्हावयाचे ठरविले, तेव्हा त्यांनी आपल्या घरी पाठवलेले निरोपाचे पत्र बोलके आहे.

प्रिय बंधूनो,

"तुम्हाला हे पत्र लिहित असतांना मला क्लेश होत आहेत आणि हे पत्र वाचल्यावर तुम्ही देखील फार कष्टी व्हाल, हे मला कळते.

"मुंबई म्युनिसिपालिटीतल्या नोकरीचा मी राजीनामा दिला आहे... आजीव सभासद म्हणून मी सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीला जाऊन तावडतोब मिळत आहे. याबाबतीत मी कोणाचाच सल्ला घेतलेला नाही. सर्वस्वी माझ्या सदसद्विवेकबुध्दीला स्मरून मी हा निर्णय घेतला. माझ्या सदसद्विवेकबुध्दीचीच काही गफलत झाली असेल तर, अर्थातच, माझा हा निर्णय चुकीचा म्हणावा लागेल. ते काही असो, पण सदसद्विवेकबुध्दीची टोचणी मला आता हा निर्णय घेतल्याशिवाय क्षणभरही स्वस्थ बसू देत नाही.[३४]

सर्वांच्याच ठिकाणी ठक्करबाप्पासारखे धैर्य नव्हते. "इंडियन पीपल" या वृत्तपत्राचे तेलगू संपादक सी.वाय्.चिंतामणी हे अलाहाबादहून प्रसिध्द होणाऱ्या "लीडर" या दैनिकाचे संपादक म्हणून पुढे ख्याती पावले. सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे आजीव सदस्य बनण्यातली आपली असमर्थता त्यांनी गोखल्यांना पत्र लिहून कळविली -

"तुमच्या हाताखाली प्रशिक्षण घेण्याचा विशेषाधिकार संपादन करण्यासारख्या परिस्थितीत ईश्वराने मला ठेवले नाही, याबद्दल मी स्वत:ला शिव्याशाप देत आहे. वाजवीपेक्षा जास्त दुर्भाग्य व हालअपेष्टा सोसलेली आई, एक विधवा बहीण व आईविना पोरका मुलगा, इतक्यांचा सांभाळ मला करावयाचा आहे.... माझे वडील बंधू दिवाळे काढून बसले आहेत, आणि या विशाल जगात एका रुपयाचीही पत नसलेल्या अवस्थेत आम्ही दहा दिशांना पांगलेले आहोत."

तरुण राजेंद्र प्रसादांनीही याच प्रकारचे कारण पुढे केले. राजेंद्रप्रसादांनी पाटण्यात नुकतीच वकिली सुरु केली होती व या व्यवसायात ते लौकिक कमावतील

अशी चिन्हे दिसत होती. राजेंद्रप्रसाद पुढे स्वतंत्र भारताचे पहिले राष्ट्रपती झाले.[35] बत्तीस वर्षांचे मु.रा. जयकर सोसायटीच्या स्थापनेच्या आधी तीन आठवडे गोखल्यांना भेटले होते. जयकरांनी आपल्या रोजनिशीत नोंद केली.

"गोखले अतिशय उत्साहाने आपल्या योजनेबद्दल बोलले. आपली कल्पना समजावून सांगत असतांना या ज्येष्ठ देशभक्ताच्या चेह-यावर आगळीच प्रभा फाकली होती. सकाळच्या कोवळ्या उन्हात त्यांचा चेहरा तेजाने उजळून निघाला होता. मी माझ्या सद्य:परिस्थितीची आणि माझ्या समोरच्या अडचणीची त्यांना पूर्ण कल्पना दिली. त्याना फार निराशा वाटली.... माझ्या कौटुंबिक अडचणी जरा निवारू द्या. मला थोडी सवड द्या, अशी मी विनंती केली. त्यावर ते म्हणाले, आणि योग्य तेच म्हणाले - की, दरम्यानच्या काळात "माझा विचार बदलू शकतो किंवा तुम्हाला सोसायटीत प्रवेश देण्याइतकी वर्षे मी जिवंत राहीन अशीही कांही खात्री नाही. शिवाय, या वयातली तुमची दहा वर्षे आणि नंतर तुम्ही देऊ करताय ती वीस वर्षे सारख्याच मोलाची आहेत."

जयकर सोसायटीस येऊन मिळाले नाहीत. "देशसेवक न बनल्याबद्दल मायभूमीकडून होणा-या निंदेपेक्षा जिवलग मातेवाईकांच्या डोळ्यांतले अश्रु जास्त मोलाचे वाटणा-यापैकी मी एक आहे,[36] वाटल्यास त्याबद्दल मला क्षमा करू नका, पण मला समजावून घ्या, अशी जयकरांनी गोखल्यांची मनधरणी केली.

<u>भारत सेवक समाजाचे कार्य :</u>

नामदार गोपाळ कृष्णगोखल्यांच्या भारत सेवक समाजाच्या उदाहरणांवरून त्यांचे शिष्य म. गांधी यांनीही पुढे आपल्या राजकारण साधनेत असेच आश्रम काढले. त्याचप्रमाणे पंजाबचे प्रभावी देशभक्त लाला लजपतराय यांनी विसाव्या शतकाच्या तिस-या दशकाचे प्रारंभी लोकसेवक संघ स्थापन केला. भारत सेवक समाजाची घटना आणि त्या घटनेनुसार आवश्यक ती आचारसंहिता बनवून

गोखल्यांनी ती सर फिरोजशहा मेहता आणि प्रि.सेल्बी यांच्या अभिप्रायार्थ पाठविली होती. एकप्रकारे या महत्त्वाच्या पण व्यक्तिगसंतीच्या गोष्टी बाजूला ठेवल्या तरी भारत सेवक समाजाची स्थापना ही एक अपूर्वाईच होती.[३७] भारत सेवक समाजाच्या सभासदांनी आदिवासींची सेवा केली आहे, तसेच आंतर-राष्ट्रीय क्षेत्रातही कामक-यांचे प्रश्न प्रभावीपणे हाताळले आहेत. नद्यांचे पूर, दुष्काळ, रोगांच्या साथी, धरणीकंप, यांनी रंजल्या-गांजल्या जनतेची नम्रपणे जिवापाड सेवा केली आहे. स्त्रियांना शिक्षणाची क्षेत्रे उपलब्ध करुन दिली आहेत. गोरगरीबांच्या नित्य जीवनातील आर्थिक विवंचना सहकारी पत-पेढ्यांच्या द्वारा दूर केल्या आहेत. ना. श्रीनिवासशास्त्री ठक्करबाप्पा, नारायण मल्हार जोशी, गोपाळ कृष्ण देवधर, आर्.आर्. बरवले, श्रीधर गणेश वझे, नटेश अप्पाजी द्रविड, वामनराव पटवर्धन, हृदयनाथ कुंझरु, कोंडा-प्पा राव, कृष्णाजी गणेश लिमये, ए.डी. मणी भारतसेवकांची नावेच अशी आहेत की, ज्यांच्या बहुमोल भारतसेवेचे स्मरण होऊन कोणाही विचारवंताची मान आदराने लवलीच पाहिजे.[३८]

ना. गोखल्यांच्या पुण्यस्मरणार्थ "गोखले स्कूल ऑफ पॉलिटिक्स ॲण्ड इकॉनॉमिक्स" ही संस्था आंतरराष्ट्रीय किर्तीचे अर्थशास्त्रज्ञ प्रा.धनंजय गाडगीळ यांच्या मार्गदर्शनाखाली चालू केली. ना. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या भारत सेवक समाजास जाऊन मिळावे असे म. गांधी, पं. जवाहरलाल नेहरु, राजेंद्र प्रसाद अशा भल्याभल्यांच्या मनात आले. यातच भारत सेवक समाजाच्या जीवनहेतूचे रहस्य सामावले आहे. टिकाऊपणाने सतत राष्ट्रसेवावृत्ती प्रवाहित ठेवणे ही भारताची मोठी गरज गोखल्यांच्या भारत सेवक समाजाने ओळखली आणि ती पूर्ण केली. [३९]

......

## प्रकरण तिसरे

### संदर्भ

१) नंदा बलराम, गोपाळ कृष्ण गोखले, ब्रिटिश राजवट व भारतीय नेमस्त युग, विश्वकर्मा साहित्यालय सदाशिव पेठ, टिळक पथ पुणे-२, आक्टोबर, १९८६, पृ. २६१.

२) साने गुरुजी, नामदार गोखले चरित्र, व्हिनस प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १९२५, पृ. १५१, १५२.

३) उक्त, पृ. १५२.

४) उक्त, पृ. १५०, १५१.

५) उक्त, पृ. २६२.

६) उक्त, पृ. २६२, २६३.

७) उक्त, पृ. २६३.

८) उक्त, पृ. २६३, २६४.

९) उक्त, पृ. २६४.

१०) कुंजरू पंडित -हृदयनाथ, गोपाळ कृष्ण गोखले, व्यक्ति आणि कार्य, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली, ९ मे, १९६६, पृ. १५.

११) गोखले पुरुषोत्तम पांडुरंग, नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचे चरित्र, नीलकंठ प्रकाशन, पुणे-९, प्रथमावृत्ती, १९६६, पृ. ७४.

१२) उक्त, पृ. ७४.

१३) नंदा बलराम, उक्त, पृ. २६३.

१४) Bakshi S.R., Gopal Krishna Gokhale, The Moderate Leader, Anmol/Publications 1991, Page No. 23.

१५) उक्त, पृ. २४.

१६) साने गुरुजी, उक्त, पृ. १४९.

१७) उक्त, पृ. १५०.

१८) वाळींबे मो.मा., महामानव नामदार गोखले, अरगडे, कुलकर्णी, प्रकाशन,पुणे-३०, प्रथमावृत्ती, १९६९, पृ. १९.

१९) उक्त, पृ. २०.

२०) गोखले पुरुषोत्तम पांडुरंग, उक्त, पृ. ७५.

२१) उक्त, पृ. ७५, ७६.

२२) उक्त, पृ. ७७.

२३) फाटक नरहर रघुनाथ, आदर्श भारत सेवक गोपाळ कृष्ण गोखले चरित्र, मौज प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, १९६७. पृ. ७८

२४) उक्त, पृ. ७८.

२५) गोखले पुरुषोत्तम पांडुरंग, पृ. ७७.

२६) साने गुरुजी, उक्त, पृ. १५५.

२७) फाटक नरहर रघुनाथ, उक्त, पृ. ७७.

२८) उक्त, पृ. ७७.

२९) उक्त, पृ. ८१.

३०) उक्त, पृ. ८१.

३१) उक्त, पृ. ८०.

३२) उक्त, पृ. ८०, ८१.

३३) नंदा बलराम उक्त, पृ. २६५.

३४) उक्त, पृ. २६५, २६६.

३५) उक्त, पृ. २६६, २६७.

३६) जयकर एम्.आर., द. स्टोरी ऑफ माय लाइफ, मुंबई, १९५८, खंड १, पृ. ६५.

३७) गोखले पुरुषोत्तम पांडुरंग, उक्त, पृ. ७८.

३८) उक्त, पृ. ७८.

३९) उक्त, पृ. ७९.

.......